INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 5 | JUNE – 2021

# मराठी साहित्यातील स्त्रीवाद : जाणिवा आणि आकलन

श्रीमती वंदना उत्तमराव वरकड
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा, जि.जालना.

## प्रास्ताविक :



भारतात पारंपारिक जातीव्यवस्थेचा कुटुंबव्यवस्थेवर बराच प्रभाव आहे. रुढ असलेल्या नियमानुसार एकाच जातीचे जोडीदार निवडले जातात. त्यात पुत्रजन्माचे विशेष काही वेगळेच आहे. या बरोबरच महत्त्वपूर्ण बाब म्हणजे कुटुंब ही पितृसत्ताक असल्यामुळे स्वीचे कुटुंबातील स्थान आजही दुय्यम आहे. पारंपरिक कुटुंबात व्यक्तिचे सुख, मन, विचार, मत, निर्णय यापेक्षा कुटुंबाची परंपरा, प्रतिष्ठा या गोष्टींना प्राधान्य असते. भारतात आज २१ व्या शतकाही वरदक्षिणा घेणे स्तुत्य ठरते. कुटुंबातील निर्णय स्वातंत्र्याधिकार पुरुषाच्या हातात असल्यामुळे पुरुषकेंद्री कुटुंब दिसतात. पण या कुटुंबात स्त्रियांना स्वतःची वेगळी ओळख असणे ही संकल्पना भारतीयांच्या अजूनही गळी उतरलेली नाही. विवाहानंतर गर्भसंस्कार देऊन स्त्री ही पुरुषातच सामावलेली आहे. तिला स्वतःचे व्यक्तित्व् नाही, ती दुर्बल आहे. असेच विचार हस्तांतरीत होत असल्याने अपवादात्मक स्त्रिया म्हणजेच मूठभर पांढरपेशा वर्गातील स्त्रिया स्वतःचा विकास करून घेताना दिसतात. उलटपक्षी मध्यमवर्गीय, ग्रामीण भागातील चाकोरीबद्ध जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या मते पुरुषाची अर्धांगिनी ही त्यांची ओळखही त्यांना भूषणावह वाटते.

भारतीय समाजात कुटुंबसंस्थेइतकाच भारतीय माणसाच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचा मूळ आधार धर्मश्रद्धा आहे. येथील कौटुंबिक, वैवाहिक, सामाजिक व आर्थिक जीवनाला धर्माचे अधिष्ठान आहे. हिंदू धर्मामध्ये पुरुषार्थाची चार ध्येय सांगितली आहेत. धर्म, अर्थ, काम, मोक्ष परंतु ही चारही ध्येये समर्थपणे पेलणाऱ्या स्त्रीच्या स्त्रीत्वाची ध्येय म्हटली जात नाहीत. उलट काही धर्मग्रंथांमध्ये स्त्रियांबद्दल अपसिद्धांत मांडलेले दिसतात. अनादिकालापासून स्त्रीसाठी केलेल्या नियमावलीत आजही विशेष फरक पडलेला नाही. स्त्रियांची सोळा शृंगाराची जोपासना करण्याची परंपरा या ना त्या कारणाने आजपर्यंत प्रचलित आहे. स्त्रियांच्या बाह्य आणि आंतरिक शृंगाराचे स्वरूप पुरुषांनी आखून दिलेले होते. त्यात स्वरूपात वावरणाऱ्या पुष्कळ स्त्रिया आपणास आढळतात. पुरुषांनी आखून दिलेल्या नियमावलीचा पुढील प्रमाणे प्रमाणे समावेश होतो. चोळी अंगाबरोबर घालणे, योग्य व बेताचे दागिने घालणे, साडी व्यवस्थित नेसणे, गजगती असणे, हरिणाक्षी असणे, वेणीफणी नित्य करणे, सुवासिक फुले माळणे, नेत्रात काजळ घालणे, कुंकू कपाळी लावणे, शरीर सडपातळ ठेवणे, गौर वर्णकांती राखणे, निद्रा थोडीशीच घेणे, हसतमुख असणे, मधुर भाष्य करणे, हात राखून खर्च करणे, आदरातिथ्य करणे, आणि अंतश्रृंगार अपेक्षित होता अपेक्षित होता. तो पुढील सद्गुणांनी युक्त असा, "दया, क्षमा, शांती, प्रीती, निती, भक्ती, चातुर्य, धैर्य, सहिष्णुता, ज्ञानलालसा"[१] या उदाहरणांतून, नियमावलीतून आताही स्वखुशीने जाणाऱ्या स्त्रिया भारतात कमी नाहीत.

पुरुषांपेक्षाही अंधश्रद्धाळू असणाऱ्या स्त्रियांचे बव्हंशी व्रत हे त्यांच्या पतीसाठी, कुटुंबासाठी आहे. हरितालिका, वटपौर्णिमा, मंगळागौर, वैभवलक्ष्मीव्रत यांची उपासना व व्रतवैकल्ये करणाऱ्या मुली, स्त्रिया घरोघरी आढळतात. म्हणूनच अशा रुढीप्रिय, परंपराप्रिय सुवासिनीच्या देशात स्त्रीवाद ही संकल्पना फक्त कल्पनापातळीवर व्याख्येच्या संबंधात पुस्तकी जगापुरती आहे. की, भारतात वास्तवात स्त्रीवाद रुजू पहातोय ? हा प्रश्न सतत भेडसावत आहे.

मात्र स्त्रीवाद ही आकारास आलेली संकल्पना म्हणजेच स्त्री प्रश्न, स्त्री मुक्ती वाटचाल, स्त्री स्वातंत्र्य याचेच एक अंग आहे. साहजिक स्त्री आणि पुरुष मिळून तयार होणाऱ्या कुटुंबव्यवस्थेत आणि विवाहव्यवस्थेत पडलेल्या ठिणग्या म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळ होय.

## स्त्रीवाद स्वरुप :

भारतीय भारतीय कुटुंब व्यवस्थेमुळे, विवाहसंस्थेमुळे अनेक नात्यांनी भारतीय स्त्री बांधली गेली आहे. पर्यायाने नाती आणि नात्यांनी येणारी बंधने स्त्रीयांच्या न्याय-अन्यायाला कारणीभूत होत आहेत. तसेच नाते व्यवस्था चोख असल्यामुळे बंधनाबरोबर स्त्रियांसाठी दर्जासुद्धा ठरलेला आहे. त्यामुळे कुटुंबात भूमिकांचे संघर्ष, दर्जा व्यवस्थेने उठणाऱ्या किंवा उठलेल्या वादळांना, संघर्षनाच स्त्रीमुक्ती चळवळ म्हटले गेले आणि या संघर्षांनी गाठलेले टोक म्हणजे स्त्रीवाद होय.

स्वीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत, कुटुंबव्यवस्थेचे उच्चाटन, अवास्तव स्त्री स्वातंत्र्य या गैरसमजुतीचे लोण पसरल्यामुळे अनेक स्त्रियांचीच विशाभूल होत आहे. मागे वळून पहाता लक्षात येते की, महदंबापासून वेणाबाईपर्यंतच्या अनेक स्त्रियांनी प्रचलित चाकोरीबाहेरील जीवन जगून साहित्यातही कर्तृत्व गाजवले आहे. मात्र, मध्ययुगीन कालखंडात पडदा संस्कृतीने स्त्रियांचे अवमूल्यन केले आहे. पारंपरिक संज्ञा स्त्रीभोवती इतकी पक्की गुंफली गेली की पुरुष तर स्त्रिला दुय्यम समजतच परंतु तथाकथित स्त्रीसुद्धा कर्माचे भोग म्हणत दबलेल्या हुकारांनी जगताना स्पष्ट दिसते. स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन अनुत्पादक, दासी, उपभोग्य वस्तु, मालकी हक्क असा झाला होता. त्याच दरम्यान १८८२ मध्ये ताराबाई शिंदेच्या स्त्री-पुरुष तुलना या ग्रंथाने स्त्रीवादाची पहिली वैचारिक मांडणी केली. इथूनच स्त्री शिक्षणाची, स्त्री चळवळीची सुरुवात झाली. स्त्री स्वतः उत्क्रांतीच्या टप्प्यात तिचे कौटुंबिक, सामाजिक स्थान या बाबत जागरूक होऊ लागली. सिमॉन दि बोव्हा या फ्रेंच लेखिकेने १९४९ साली दि सेकंड सेक्स' या ग्रंथातून स्त्रीवादी विचारधारेची पायाभूत मांडणी केली आणि स्त्री प्रश्नांकडे डोळसपणे पाहण्यास प्रत्येक व्यक्तीस उद्युक्त केले. अशा प्रकारे स्त्रीची सनातन प्रतिमा पुसणे, स्त्रियांची गुलामगिरी थांबवणे, त्याचबरोबर सक्षम माणूस म्हणून जगण्याची संधी मिळविणे हे स्त्रीवादाचे उद्दिष्ट झाले आहे. स्त्रीवादाच्या स्वरुपाबद्दल डॉ. मंगल वरखेडे म्हणतात की, "समाजकारण, अर्थकारण, राजकारण, कला व वाडमय व्यवहार या सर्व क्षेत्रात स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुय्यम स्थान नाकारून माणूसपणाचा क्षमाधिष्टीत हक्क हक्क प्राप्त करण्यासाठी केलेली राजकीय चळवळ हे स्त्रीवादाचे सर्वसाधारण स्वरूप आहे"[२] डॉ. मंगला वरखेडे यांच्या मताशी मी सहमत आहे. स्त्रीवादाने राजकीय प्रणालीचे स्वरूप धारण केलेले आहे. भारतात कुटुंब व्यवस्थेला महत्व आहे. इथे पुरुषसत्ताक कुटुंबपद्धती असल्यामुळे कुटुंबातील, समाजातील निर्णयस्वातंत्र्य अधिकार पुरुषाकडे आहे. म्हणजे एका बाजुला भारतात लोकशाही आणि प्रत्येक कुटुंबात मात्र पुरुषाची हुकुमशाही अस्तित्वात आहे. परंपरेने पुरुषाला उच्च दर्जा दिल्यामुळे साहजिकच स्त्रीकडे कनिष्ठत्व आले आहे. असे म्हटले जाते की, स्त्री आणि पुरुष ही संसाररथाची दोन चाके आहेत. परंतु वास्तवात मात्र स्त्री-पुरुष म्हणजे सायकलची दोन चाके वाटतात, की ज्यात ओझे वाहण्याची सोय मागच्या चाकावर आणि ब्रेक लावला तर मागील चाक प्रथम थांबते अशी डावी अवस्था स्त्रीवर्गाची झाली आहे. पुरुषी अहंकारामुळे स्त्रियांची गळचेपी होते आहे. या वास्तवाची जेंव्हा स्त्रियांना जाणीव झाली. तेव्हापासून स्त्रियांनी स्त्री हक्कासाठी लढा द्यायला सुरुवात केली. लोकशाही असणाऱ्या देशातील स्त्रियांना स्वतःच्या हक्कासाठी अस्तित्वासाठी लावलेल्या दुय्यमत्वाला नाकारून माणूस म्हणून जगता यावे यासाठी एकत्र येऊन लढा देण्याची गरज आहे. आज एकविसाव्या शतकातही खडोपाडी मुलीना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. इतर देशांच्या तुलनेत

भारतातच पुरुष-स्त्रिया गुणोत्तर विपरित आहे. अपत्य होऊ देणे, कोणते अपत्य जन्माला घालायचे याबाबतचे निर्णय आजही भारतात पुरुषच घेतात. खरे तर मातृत्व ही स्त्रीला मिळालेली निसर्गाची देण आहे. तरीही कुटुंबातून, पुरुषांकडून स्त्रीवर मातृत्व लादले जाते. यथेच स्त्री अजूनही पुरुषकेंद्री समाजाची दासी असल्याचे दिसते. स्त्रीच्या या अध:पतनामागचे पुरुषी राजकारण स्त्रीला समजू लागले. त्यामुळे स्त्रिया जागृत होऊन संघटीत होऊ लागल्या. राजकारणातून, कुटुंबातून, समाजातून व साहित्यातही स्त्रीयांच्या आधुनिक प्रतिमा जन्माला आल्या. डॉ.आश्विनी धोंगडे यांच्या मते, "स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत घेऊन स्वतःच्या सवता सुभा निर्माण करणे नव्हे. पण, संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारुन तिला जी पशूतुल्य अवस्था प्राप्त करुन दिली, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करुन घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे."[३] एकंदरीत स्त्रीवाद संकल्पना लक्षात घेता आपणासमोर प्रश्न उभा रहातो की, हा स्त्रीवाद स्त्रीमुक्ती, स्त्री चळवळ आपल्या भारतात रुजू शकेल काय ? ही शंका येण्यामागचे कारण म्हणजे स्त्रीवाद पाश्चात्यांकडून आलेले वारे म्हटले जाते. पर्यायाने पाश्चात्य स्त्रीवाद ही संकल्पना स्पष्ट होणे आवश्यक आहे.

## स्त्री रचित साहित्यात प्रगटलेला स्त्रीवाद :

साहित्यकृती ह्या सभोवतालच्या घडणाऱ्या प्रत्येक घटनांचे सत्यात उतरणारे पडसाद असतात. साहित्यात येणारे विषय व प्रश्न यांचे सामाजिक भान साहित्यात असते. पाश्चात्य स्त्रीवाद क्रियाशील, कृतिशील झाला तो साहित्याच्या माध्यमाने ! पाश्चात्य साहित्यिकांनी स्त्री प्रश्न, स्त्री मुक्ती, स्त्रीवाद यावर सखोल चिकित्सा केली व या विषयावर अनेक ग्रंथ लिहिले आणि आजही लिहिले जात आहेत. त्यानुसार विचार केला तर भारतीय मराठी साहित्यात वेदोत्तर कालखंडापासून स्त्रीला दुय्यम स्थान आहे. संस्कृत नाटकातील स्त्रीच्या तोंडची वाक्ये प्राकृत भाषेतील असत. यावरुनच तत्कालीन स्त्रियांचे साहित्यातही गौण स्थान दिसते. याला अपवाद संतकवयित्रींनी आपल्यावर लादलेली अन्याय्य बंधने झुगारुन आत्माविष्काराची एक लहानशी वाट शोधलेली दिसते. जसे भक्ती, मुक्ती, साहित्यनिर्मिती, अविवाहित राहणे इत्यादी स्त्रीजातीला धर्माने स्पष्टपणे नाकारलेल्या वाटा महदंबा, मुक्ताबाई, वेणाबाई, बहिणाबाई यांनी चोखाळल्या. शिवाय साहित्यनिर्मितीव्दारे स्त्री अगतिकतेची बीजे रोवली आणि याप्रकारे लढा देऊन मार्गक्रमण केले. सतराव्या-अठराव्या शतकातही मराठा राजघराण्यातील काही स्त्रियांनी संधी घेऊन पारंपरिक स्त्री भूमिकेची चौकट बाजूला सारुन लढाया, कटकारस्थाने, डावपेच, राजकारण या सर्व प्रांतात पुरुषांच्या बरोबरीने कर्तृत्व गाजविले. १८८२ मध्ये ताराबाई शिंदे यांनी तथाकथित संपूर्ण समाजाला स्त्री अस्तित्वाची नवी ओळख 'स्त्रीपुरुष तुलना'तून करून दिली. त्या म्हणतात की, "जोडीवाचून कोणतेच काम नाही तेंव्हा या जगदारण्यांतून तुम्ही एकटे फिरु शकाल ? हा संसार तुम्ही स्वतः चालवाल काय ? प्रपंचाचे शेत तुम्ही एकटे नांगरुन काढाल काय ? स्त्री विरहित तिचे मुखावलोकन न करिता तुम्ही संन्यास वृत्तीने एकदोन महिने तरी राहू शकाल काय ? अरे पहा स्त्री जर तुम्हास सोबत नसली तर तुम्हाला जोड्याजवळ देखील उभे करण्यास तेच तुमचे काका, बाप मागे करितात, सड्याफटिंगला पुसतो कोण?"[४] अशा क्रांतीकारी शब्दात तत्कालीन स्त्री प्रतिमेला जाग आणून दिली. तर पुरुषकेंद्री समाजाच्या स्त्रीविषयक आदर्श गृहिणी कल्पनेला धक्का दिला. मला वाटते या ग्रंथानेच भारतात स्त्रीवाद आणि स्त्रीवादी साहित्याला जन्माला घातले. ताराबाई शिंदे नंतरच्या काव्यात प्रस्थापित पुरुषप्रधान मूल्यवस्थेचा प्रतिकार करणारी अथवा ती उलथ्वून टाकण्याची शक्यता वा शक्ती दाखवून देणारे अमाप स्त्री साहित्य निर्माण झाले. रुढीग्रस्त स्त्री जीवनाचे चित्रण करणारी ह.ना.आपटे यांची 'पण लक्षात कोण घेतो' ही कादंबरी १८९३ मध्ये प्रसिद्ध झाली. तर १८९९ मध्ये जरठबालविवाहाचा निषेध करणारे गो. ब. देवलांचे 'शारदा' नाटक समाजसमस्यांवर प्रकाश टाकून गेले. जणू शेकडो वर्षापासून आतल्याआत खवखवत असणाऱ्या दु:खाला, अपमानाला वाचा फुटली. त्यामुळे १९ व्या शतकाच्या पार्श्वभूमिवर बंडखोर स्त्रीवादी साहित्याची लाट पसरली. खरे तर महाराष्ट्रातील स्त्री मुक्तीची गंगोत्री म्हणजे सावित्रीबाई फुले. त्यांनी स्त्री शिक्षणाची बीजे रोवली. तर स्त्री अस्मितेचा आवाज स्वबळावर बुलंदपणे उठवणारी भारतातील पहिली स्त्री म्हणून पंडिता रमाबाई आहेत. तदनंतर

रमाबाई रानडे, मनोरमा मेधावी, काशीबाई कानिटकर, रखमाबाई राऊत, आनंदीबाई बर्वे, अनुताई लिमये, पार्वतीबाई आठवले, लक्ष्मीबाई टिळक, जनाक्का शिंदे, कमलताई हॉस्पेट या सर्व लेखिकांनी छोटया-मोठया संघर्षाच्या कृतीतून स्त्री चळवळीला दिशा दिली.

सरस्वती वैद्य यांचे 'प्राचीप्रभा' मासिक, सीताबाई सावंत यांचे 'गृहिणी रत्नमाला' या मासिकांनी स्त्री-पुरुष सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली . इ.स. १९०१ ते १९३० या कालखंडात स्त्रीया नियतकालिकांतून कथा व चरित्रे लिहू लागल्या. एकंदरीत एकोणिसावे शतक स्त्री जिवनाच्या दृष्टीने प्रबोधनपर्व ठरले आणि विपुल प्रमाणावर स्त्री साहित्य, स्त्री चळवळीस पोषक लेखन निर्माण झाल,

## स्त्री रचित कादंबऱ्यांमधून प्रगट झालेला स्त्रीवाद :

मराठी स्त्री रचित कादंबऱ्यामधून समाजप्रवृत्तीचे दर्शन, स्त्रीजीवन, स्त्रियांवरील अत्याचार यांचे वर्णन आलेले दिसते. काशीबाई कानिटकरांची 'रंगराव' (१९२८), शांताबाई नाशिककराची 'हाच का धर्म ?' (१९३०) अशा कादंबऱ्यांनी स्त्री जीवनाच्या समस्यांना हात घातला. १९३० मध्ये स्त्रियांचे शिक्षणाचे मार्ग मोकळे झालेले होते. काही लेखिका पदवीधर होत्या. शिक्षणामुळे पाश्चात्य आचार विचारांशी त्याचा परिचय झालेला होता. म्हणूनच स्त्री-पुरुष समानतेची जाणीवही होती. त्या जाणिवांचे हुंकार विभावरी शिरुरकर ऊर्फ मालतीबाई बेडेकर यांच्या 'हिंदोळ्यावर' (१९३४), विरलेले स्वप्न (१९३४), शालिनी तुळपुळेंची लपलेले गुन्हेगार (१९४९) सरोजिनी बाबर यांची 'तू मला भेटायला नको होतास' (१९५०) यांच्या बरोबरीने गीता साने, जोस्ना देवधर, गौरी देशपांडे या लेखिकांनी रुढीचे स्तोम, जातीयता, राजकारण, विवाह यामधील पुरुषी राजकारण, स्त्री जीवनाची बहुपदरी समस्या आपल्या कादंबरी लेखनातून स्पष्ट केल्या.

## कथा साहित्यातून स्त्री जाणिवांचे प्रकटलेले विश्व :

मराठी साहित्यात स्त्री लेखनाची परंपरा उदयाला आली. आनंदी जोशी, ताराबाई मोडक, आनंदी शिर्के, गिरीजा केळकर, कमला टिळक यांच्या कथालेखनाद्वारे समाजजागृती, स्त्री स्वातंत्र्य असे विषय साहित्यात प्रकट होत असतांनाच विभावरी शिरुरकरांच्या 'कळ्यांचे निश्वास' या कथेने स्पष्टपणे आणि थेटपणे नवशिक्षित स्त्रीच्या मनाची जडणघडण आणि तिची सुखदु:खे यांचा वेध घेतला तर कुसुमावती देशपांडे यांच्या कथांतून कारुण्य, कल्पनारम्यता यापेक्षा वास्तवजीवनाचे दर्शन होऊ लागले. यांच्याच बरोबरीने मालतीबाई दांडेकर, कमल फडके, पिरोज आनंदकर, शांता शेळके, कमल देसाई, गौरी देशपांडे, गीता साने, सानिया या कथा लेखिकांनी स्त्रीयांची दबलेली मने मोकळी केली. कित्येक वर्षांच्या समस्यांच्या कोंडी फोडल्या आणि स्त्री चळवळीवर आधारित कथांची निर्मिती केली. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कथांमधुन स्त्री-पुरुषांमध्ये येणारा लिंगाधिष्ठित साचेबंदपणा पुरुषांच्या स्त्रीविषयक प्रतिमा, लैंगिक क्रांतीची कल्पना यावरील अत्याचार या आणि अशा विविध प्रश्नांना हाताळले गेले.

कथा साहित्याइतकेच स्त्रियांनी आत्मचरित्रातून समाजात स्वतःचा वेगळा ठसा उमटवला आहे. रमा रानडेंचे 'आमच्या आयुष्यातील आठवणी', लक्ष्मी टिळकांचे 'स्मृतिचित्रे' व सुनिता देशपांडेंचे 'आहे मनोहर तरी', माधवी देसाई 'नाच गं घुमा' यांपासून तर मलिका अमरशेखांचे 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' या आत्मचरित्रांची मालिका पाहिली असता सर्वस्वी आत्मचरित्रकारांनी लज्जा, संकोच, सतत मूक सोसणे टाकून धिटाईने बेधडकपणे लिहिले आहे. पती-पत्नीचे दोन समान पातळीवरचे जीणे, गर्भधारणेचे हक्क हे सर्व वैयक्तिक अनुभव शब्दबद्ध केले आहेत आणि आत्मचरित्रातूनही स्त्रीस्वातंत्र, स्त्रीवाद या विचारसरणींनी प्रवास सुरु झाला आहे. कथा, कादंबरी, आत्मचरित्रे इत्यादी साहित्यप्रकाराप्रमाणे नाटक केवळ शब्दाविष्कार नाही तर उद्दिष्टांची पूर्ती साकृतरुपातील पात्रे आणि प्रेक्षकांशी थेट संवाद यांच्या सहाय्याने नाटक जन्माला येते. वेदोत्तरपासून नाटकात काम करणे, नाटक पाहणे याठिकाणी स्त्रियांना मज्जावच होता. त्यामुळे स्त्रियांच्या नाट्यलेखनाला उशिरा सुरुवात झाली. सोनाबाई केरकरांचे 'संगीत छत्रपती संभाजी' या नाटय लेखनाबरोबरच काशीबाई फडके, गिरीजाबाई केळकर, मालती तेंडूलकर,

आनंदीबाई किर्लोस्कर या स्त्री नाटककारांनी समाजाला नव्या वाटा दिल्या. स्त्रीजीवनाला जाचणारे प्रश्न, नेहमी कोंडमारा करून जगणारी स्त्री, नवीन संधीचा शोध घेणारी स्त्री अशा स्त्री समस्यांना घेऊन पुरुषपात्रविरहित नाटके अवतरली. मालतीबाई बेडेकरांचे 'पारध', सुधा साठेंचे 'संगीत एकच गाठ', कमला प्रभूचे 'संगीत घराकडे', शकुंतला परांजपेंचे 'पांघरलेली कातडी' या शिवाय कृष्णाबाई मोटे, विमला काळे, पद्मा गोळे यांनी नाविण्यपूर्ण स्त्रीप्रतिमा नाटकातून निर्माण करत पौराणिक नाट्याला संपूर्ण फाटा दिला. तर 'चारचौघी', 'माझा खेळ माडू' या स्त्रीवादी नाटकातून स्त्रियांचे चाकोरीबाहेरील जीवन, कर्तृत्व यांचा आढावा नाटकाद्वारे घेतला आहे. या स्त्री रचित मराठी साहित्यातून स्त्रियांनी नव्या मार्गदर्शक वाटा समाजासमोर ठेवलेल्या दिसतात. स्त्रियांच्या या लेखनातून स्त्रीचे समाजातील न्याय अन्याय, सुष्ट, दृष्ट प्रवृत्तीचा व आधी स्व अनुभव, मग समाजाचा अनुभव, मग महानगरीय अनुभव अशा चढत जाणाऱ्या अनुभवाचे रुप प्रत्ययाला येते.

## संदर्भ सूची

१. बाबर सरोजिनी, स्त्री शिक्षणाची वाटचाल, महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालनातर्फे प्रकाशित, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई प्र.आ. १९६८ पृ. ५१, ५२.
२. वरखेडे मंगला, स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन, का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे, प्रकाशक डॉ.मु.ब.शहा प्र.आ. १ ९९९ पृ ०१.
३. घोंगडे अश्विनी, स्त्रीवादी समीक्षा स्वरुप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन पुणे, प्र.आ. १९९३, पृ. ०६.
४. शिंदे ताराबाई, स्त्री-पुरुष तुलना, राजेश प्रकाशन, पुणे, पृ. २१.